# हॉटेल, रेस्टॉरंटसमोरील आव्हाने, संधीवर मंथन

## असोसिएशनच्या पश्चिम विभागीय परिषदेस प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ८ : येथील हॉटेल अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशनच्या पश्चिम विभागीय परिषदेचा शुभारंभ झाला आहे. यावेळी हॉटेल, रेस्टॉरंट व्यवसायासमोरील आव्हाने व संधी यांबाबत विचारमंथन केले जाते आहे. शुभारंभप्रसंगी भारताचे क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

हॉटेल रॅडिसन ब्ल्यू येथे हॉटेल अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया यांच्यातर्फे ही तीन दिवसीय पश्चिम विभागीय परिषद होते आहे. याप्रसंगी पर्यटन मंत्रालयाचे विभागीय संचालक डी. व्यंकटेशन, हॉटेल अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी, राकेश मेहरा, शेरी भाटिया उपस्थित होते. परिषदेच्या संयोजन समितीचे प्रमुख डी. एस. अडवानी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविकात अध्यक्ष प्रदीप शेट्टी म्हणाले, की कोविड महामारीमध्ये सर्वाधिक नुकसान हॉटेल व रेस्टॉरंट उद्योगाचे झाले.

आता हळूहळू व्यवसाय पूर्वपदावर येतो आहे. भारताच्या जीडीपीमध्ये व परकीय चलन वाढविण्यात उद्योगाची महत्त्वाची भूमिका आहे. अनेक अन्य व्यवसायांना चालना तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार देणारा उद्योग आहे. दरम्यान, तीन दिवसीय परिषदेत उद्योगापुढील आव्हाने व उपलब्ध संधीवर तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते आहे.




**नाशिक : हॉटेल अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियातर्फे झालेल्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.**

### वेंगसरकरांनी वाढविला आत्मविश्वास

१९८३ च्या विश्वकरंडकाआधी कर्णधार कपिल देवला विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देताना आम्ही येथे जिंकण्यासाठी आलो आहोत, असे उद्‌गार त्याने काढले होते. त्यानंतर अविश्वसनीय असा विजय भारताने मिळवला. त्याचप्रमाणे 'वी आर हिअर टू विन' या ब्रीदवाक्यावर विश्वास ठेवून हॉटेल अँन्ड रेस्टॉरंट व्यावसायिक कोविडनंतरच्या काळातदेखील यशस्वी होतील, असा विश्वास भारताचे क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केला.